# ग्रामपंचायतीच्या कर्मचाऱ्यांच्या किमान वेतनासाठी अनुदान मंजूर करणेबाबत...

महाराष्ट्र शासन

ग्राम विकास व जलसंधारण विभाग

शासन निर्णय क्र. व्हीपीएम २६९९/प्र. क्र. २०६(१) / २१,

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

**दिनांक २१ जानेवारी २०००**

**प्रस्तावना**

मुंबई ग्रामपंचायत अधिनियमाच्या कलम ६१ प्रमाणे ग्रामपंचायतींना त्यांच्या आवश्यकतेप्रमाणे कर्मचारी नेमण्याचे अधिकार आहेत. सदर अधिनियमातील तरतुदीनुसार हे कर्मचारी ग्रामपंचायतीचे कर्मचारी आहेत. उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाच्या क्र. एमडब्ल्यूए-१७९०/६९८०/एलएबी-७, दिनांक ३ जुलै, १९९० च्या अधिसूचनेनुसार सदर ग्राम पंचायत कर्मचाऱ्यांना किमान वेतन लागू करण्यात आले आहे. परंतु शासनाच्या असे निदर्शनास आले आहे की, राज्यामध्ये अंदाजे २७,७०० एवढ्या ग्राम पंचायती असून त्यांपैकी २३,६०० एवढ्या ग्रामपंचायतींनी अंदाजे ४२,७८९ एवढे कर्मचारी नेमलेले असून जवळपास ४००० ग्राम पंचायतींनी कर्मचारी नेमलेले नाहीत व जेवढ्या ग्रामपंचायतींनी कर्मचारी नेमलेले आहेत त्यांपैकी जवळपास ७० टक्के ग्राम पंचायती त्यांची आर्थिक कुवत नसल्यामुळे त्यांच्याकडील जवळपास २४००० कर्मचाऱ्यांना किमान वेतन देऊ शकत नाहीत. म्हणून शासनाने ग्राम पंचायत कर्मचाऱ्यांच्या किमान वेतनासाठी अनुदान द्यावे अशी राज्यातील वेगवेगळ्या ग्राम पंचायत संघटनांकडून मागणी होत होती. आता सध्या राज्यात अनेक ग्राम पंचायती आपल्या आर्थिक कुवतीप्रमाणे कर्मचारी नेमत असल्यामुळे प्रत्येक ग्राम पंचायतीमधील कर्मचाऱ्यांची संख्या वेगवेगळी आहे.

**शासन निर्णय**

वरील सर्व परिस्थितीचा विचार करून प्रत्येक ग्राम पंचायतीमधील कर्मचाऱ्यांचा आकृतिबंध व त्यांना द्यावयाचे किमान वेतन या संदर्भात शासनाने खालीलप्रमाणे धोरणात्मक निर्णय घेतला आहे :

(१) यापुढे खालीलप्रमाणे लोकसंख्येच्या वर्गवारीनुसार ग्राम पंचायतीमध्ये कर्मचारी आकृतिबंद राहील :-

| ग्राम पंचायत वर्ग | कर्मचारी संख्या | कर्मचाऱ्यांचा प्रकार (प्रती ग्रामपंचायत) |
|---|---|---|
| (अ) ० ते १००० | १ | शिपाई/दिवाबत्ती/पाणीपुरवठा कर्मचारी - १ |
| (ब) १००१ ते ३००० | २ | शिपाई-१, दिवाबत्ती/पाणीपुरवठा कर्मचारी - १ |
| (क) ३००१ ते ६००० | ३ | लिपीक/वसुली कारकून - १, शिपाई -१, तथा दिवाबत्ती/पाणी पुरवठा कर्मचारी - १ |
| (ड) ६००१ ते १०००० | ४ | लिपीक / वसुली कारकून - १, शिपाई - १, पाणीपुरवठा/दिवाबत्ती कर्मचारी - १ / सफाई कामगार - १ |
| (इ) १०००० वरील | ६ | लिपीक/वसुली कारकून - २, शिपाई - १, पाणीपुरवठा/दिवाबत्ती कर्मचारी - १, सफाई कामगार - २ |

(२) मुंबई ग्रामपंचायत अधिनियमातील तरतुदीनुसार यापुढे सुद्धा ग्रामपंचायतीमध्ये कर्मचारी नेमण्याचे अधिकार ग्राम पंचायतीस राहतील व संबंधित ग्राम पंचायतीने त्यांच्याकडे प्रत्येक प्रवर्गामध्ये किती कर्मचारी नेमले आहेत याबाबतची माहिती संबंधित ग्रामपंचायत संबंधित जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांना कळवील.

Scanned by CamScanner

(३) सदर कर्मचाऱ्यांच्या किमान वेतनासाठी जो खर्च येईल त्यासाठी शासन एकूण खर्चाच्या ५० टक्के एवढे अनुदान देईल व उर्वरित ५० टक्के खर्च संबंधित ग्राम पंचायत करील.

(४) कर्मचाऱ्यांच्या किमान वेतनासाठी शासनाच्या हिश्श्याची रक्कम शासन संबंधित जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या अधिनस्त ठेवील. त्यानंतर ग्राम पंचायती प्रथम दरमहा आपल्या कर्मचाऱ्यांना किमान वेतन देतील. व त्यानंतर शासनाच्या हिश्शाच्या रकमेची प्रतिपूर्ती मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांच्याकडून करून घेतील.

(५) शासनाकडून ५० टक्के किमान वेतनाची रक्कम दिली जात आहे याचा आधार घेऊन सदर कर्मचारी शासनाचे कर्मचारी आहेत अशी मागणी करता येणार नाही.

(६) ज्या ज्या वेळेस उद्योग, ऊर्जा व कामगार विभागातर्फे किमान वेतनाचे दर वाढविले जातील त्या त्या वेळेस ते दर ग्राम पंचायत कर्मचाऱ्यांना लागू होतील.

(७) हा शासन निर्णय दिनांक १ जानेवारी, २००० पासून लागू करण्यात येत आहे.

(८) हा खर्च कोणत्या लेखाशीर्षाखाली करावा याबाबतचे आदेश वेगळ्याने काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(रा. का. पवार)

शासनाचे उपसचिव

----------

Scanned by CamScanner